**<u>श्री. पी.के.मुटकुळे, न्यायदंडाधीकारी, प्रथम वर्ग, कळवण, जि.नाशिक.</u>**

**सं.फौ.ख.क्र. ५७४/२०२२**
**निशाणी क्रमांक ०६**

| | | |
|---|---|---|
| १. | अपराध घडल्याचा दिनांक | २३/०६/२०२२ |
| २ | अहवालाचा किंवा फिर्यादचा दिनांक | २३/०६/२०२२ |
| ३ | फिर्यादीचे नांव, त्याच्या आई व वडिलांचे नांव, त्याचे वय व निवासस्थान इ. | पोलीस निरिक्षक, देवळा पोलीस ठाणे, ता.देवळा, जि.नाशिक. |
| ४ | आरोपीचे नांव, आरोपीच्या आई व वडिलांचे नाव, गांव व त्याचे निवासस्थान इ. | संदीप राजेंद्र ससाणे वय-३२ रामेश्वर, देवळा जि.नाशिक. |

५ (अ) ज्याबद्यल फिर्याद दिली आणि जो अपराध आरोपीला समजावून सांगण्यात आला त्या अपराधाचा तपशील -

तुम्ही दिनांक २३/०६/२०२२ रोजी १७.४० वाजताच्या सुमारास देवळा सटाणा रस्तयावर ता.देवळा, जि. नाशिक येथे भवगंगा ट्रेडर्स दुकानाच्या मागे कल्याण नावाचा मटका जुगार खेळतांना व खेळवितांना मिळुन आलात व त्यायोगे मुंबई जुगार प्रतिबंध कायदा कलम १२-अ अन्वये शिक्षापात्र असलेला या न्यायालयाच्या दखलक्षेत्रात गुन्हा केला.

आणि म्हणुन मी तुमच्यावर सदरहू दोषारोप ठेवीत आहे.

(पी. के. मुटकुळे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
कळवण.

दि. १२/११/२०२२

**<u>आरोपीचे निवेदन -</u>**

| | | |
|---|---|---|
| प्रश्न १ | | तुम्हाला केसच्या नकला मिळाल्या काय ? |
| उत्तर | | होय. |
| प्रश्न २ | | तुम्हाला वाचुन व समजावुन सांगितलेला आरोप समजला काय ? |

| | | |
|---|---|---|
| उत्तर | | होय. |
| प्रश्न ३ | | तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ? |
| उत्तर | | होय, मला गुन्हा कबुल आहे. |

______________________

आरोपीची सही/अंगठा

(पी. के. मुटकुळे)

दि. १२/११/२०२२

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग

कळवण.

## न्यायनिर्णय

आरोपीने त्याला गुन्हा मान्य व कबूल असल्याचे कथन केले आहे. त्याबाबत त्यांनी अर्ज सादर केला आहे. आरोपी हा स्वखुशीने गुन्हा कबुल करत असल्याची खात्री झाली. आरोपीचा प्रस्तुत गुन्हा हा पहिलाच असल्याचे दिसुन येते. त्यामुळे आरोपीला मुंबई जुगार प्रतिबंध कायदा कलम १२-अ मध्ये नमुद केल्याप्रमाणे दंड द्रव्याचे शिक्षेवर दोषी ठरविण्यात येते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## - आदेश -

**१.** आरोपी संदीप राजेंद्र ससाणे याला फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५२ प्रमाणे मुंबई जुगार प्रतिबंध कायदा कलम १२-अ या गुन्हयासाठी दोषी ठरविण्यात येते. आरोपीला रुपये २००/- (रुपये दोनशे मात्र) दंड व दंडाची रक्कम न भरल्यास त्याला १ दिवस साध्या कैदेची शिक्षा ठोठावण्यात येते.

**२.** सदर प्रकरणातील जप्त मुद्येमाल रोख रक्कम सरकारजमा करण्यात यावी व उर्वरीत मुद्येमाल जुगाराचे साहित्य मुल्यहीन असल्याने नष्ट करण्यात यावा.

(पी. के. मुटकुळे)

दि. १२/११/२०२२

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग

कळवण.